नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र. ३३५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १५ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - शिवाजी पुंजाजी हिवराळे,
वय - ७६ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - नरवेल, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझी शेती हिंगणा नागापुर शिवारा असुन त्याचे क्षेत्र २ हे. ४० आर इतके आहे. त्याचा गट क्र. ७५ आहे. सन २०२२ -२३ मध्ये मी शेतात कापुस पेरला होता. कापुस २१ क्विटल ९ किलो झाला होता. तो कापुस राजेंद्रसिंग नवलसिंग इंगळे रा. भालेगांव याने नेला होता. तो कापुस ९ हजार प्रति क्वींटल या दराने ठरला होता. त्या कापसाचे पैसे मला २० दिवसाने व उर्वरीत रक्कम ४० दिवसाने देण्याचे ठरले होते. मी राजेंद्र इंगळे याला ओळखतो कारण त्याची मुलगी तेरखेडा येथे दिलेली आहे. त्यांची आमची ओळख आहे. नरवेल व तेरखेडा हे वेगवेगळे गावे असुन ते जवळजवळ आहे. राजेंद्रसिंग इंगळे हा जगन नारखेडे चा मध्यस्थी माणुस होता. तो कापुस त्यांनी दारी मोजुन गाडीतुन नेला. तो कापुस ०८/०८/२०२३ रोजी नेला. त्या कापसाचे किती पैसे झाले होते त्याचा हिशोब मी केला नाही. त्या कापसाचे पैसे मला २१,०००/- त्याच दिवशी दिले. त्याने कापुस नेल्यानंतर त्या मध्यस्थी माणसाने जगन नारखेडे कडे चला असे म्हटले. त्याने मला पैश्यांसाठी चला म्हटले. त्यानंतर मी जगन नारखेडे कडे गेलो. त्याने मला पैसे दिले नाही. त्यानंतर आम्ही कोर्टात आलो, व तिथे लिखापडी झाली. त्यानंतर काहीही झाले नाही. मी जगन नारखेडे याला ओळखतो. त्याल मी एकदाच पाहिलेले आहे. तो आज दृकश्राव्य पद्धतीने हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.१ व ११ तर्फे विधीज्ञ श्री.आर. एस. जगताप याचंचेमार्फत सुरु....**

०२. माझे शिक्षण ४ थी पर्यंत झाले आहे. मला लिहिता वाचता येते. मी पोलीसांना

जवाब देतेवेळी माझ्या शेताचा गट क्र. ७५ असल्याचे सांगितले होते. माझ्या जवाबात नमुद केलेला गट क्र. ७५६ हा चुकीचा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत कापुस मोजतेवेळी जगन नारखेडे हा हजर नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझे मित्र बळीराम इंगळे यांच्या सांगण्यावरुन तो कापुस मी राजेंद्र इंगळे याला दिला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी कापसाची सी.सी.आय. मार्फत खरेदी चालु होती. हे म्हणणे खरे नाही की, सी.सी.आय. मार्फत चालु असलेल्या कापसाचा भाव ९ ते १० हजार प्रति क्विटल होता.

मी सन २०२२-२३ मध्ये शेतामध्ये कापुस पेरल्याबाबत पेरेपत्रक तपासकामी पोलीसांना दिले नव्हते. मी तो कापुस राजेंद्र इंगळे यांना दिल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीला कळविले नव्हते. इंगळेने आणलेल्या गाडीचे मालकीचे कागदपत्र पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत व्यवहार मी जगन नारखेडेशी केलेला नाही. साक्षीदार स्वताहुन सांगतो की, फोनवर बोललो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे मित्र बळीराम इंगळे याच्या शब्दावर विश्वास ठेवुन कापुस दिला. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे राजेंद्र इंगळे याला कोणताही कापुस दिलेला नसुन तो कापुस त्याने जगन नारखेडे याला विकलेला देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर मी खोटा सांगत असुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. मी पोलीसांना माझ्या शेताचा गट क्र. ७५ असल्याचे सांगितले होते. सदर बाब माझ्या जवाबात का नमुद नाही याचे कारण मी सागु शकत नाही. मी पोलीसांना जवाब देतेवेळी सन २०२२-२३ मध्ये संपुर्ण शेतात कापुस पेरला असुन तो कापुस २१ किवटल ९ किलो झाला असल्याचे सांगितले होते. माझ्या जवाबात २१ किवटल ९ किलो कापुस झाल्याची बाब माझ्या जवाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. मी पोलीसांना जवाबदेतेवेळी मी राजेंद्र इंगळे याला ओळखतो कारण त्याची मुलगी तेरखेडा येथे दिलेली आहे. त्यांची आमची ओळख आहे. नरवेल व तेरखेडा हे वेगवेगळे गावे असुन ते जवळजवळ आहे ही बाब मी पोलीसांना सांगितलेली नव्हती. तसेच मी जवाब देतेवेळी तो कापुस दारी मोजुन गाडीतुन घेवुन गेले असे सांगितले नव्हते. तसेच मी पोलीसांना जवाब देतेवेळी त्याने कापुस नेल्यानंतर त्या मध्यस्थी माणसाने जगन नारखेडे कडे चला असे

म्हटले. त्याने मला पैश्यांसाठी चला मटले. त्यानंतर मी जगन नारखेडे कडे गेलो. त्याने मला पैसे दिले नाही या बाबी मी पोलीसांना सांगितल्या नाही सदर बाबी मी पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे. मी स्वताहुन पोलीसांकडे रिपोर्ट दिलानाही. तसेच मी पैसे बाकी असल्याबाबत राजेंद्र इंगळे किंवा जगन नारखेडे यांच्या विरुद्ध आजपर्यंत वसुली दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्यात व त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा व्यवहार झालेला नसल्याने व तसेच कोणतीही रक्कम घेणे लागत नसल्यामुळे मी त्याच्याविरुदध कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क. २ ते १४ यांना ओळखत नसुन त्यांचा या व्यवहाराशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०५. आरोपी क्र.१ ते ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र.१ ते ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र.१ ते ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र.१ ते ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. आरोपी क्र.१ ते ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

११. आरोपी क्र.१ ते ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१२.   आरोपी क्र.१ ते ३ व ११  यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.11.24 12:20:02 +0530

दिनांक : १९/११/२०२५.

( **पी.एस.ठाकरे** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर